# झरोका

एक – राज्य सरकार न्यायीक व पारदर्शक असतानाही महात्मा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थे कडून माहीती अधिकार कार्यकर्त्याना योग्य माहिती दिली जात नाही हे अजबच वाटते. सरकार करते आह तरी काय हे कांहीच कळत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, राज्य सरकारला वेळ कोठे आहे. विरोधकाना तोंडघसी पाडणे, उणे, दूणे काढण्यातच शिंदे, फडणवीस, पवार हे रति, महारती गुंतले आहेत मग सरकारी काम चार वर्ष थांब अशीच आरटीआय कार्यकर्त्याची महाज्योती कढून बोळवण होत असेल त्यात नवल कसले.

एक – अहो, आरटीआय कार्यकर्ते खरात यानी महाज्योतीकडे कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गतचा खर्च, टेंबलेट खरेदी खर्च आणी विविध उपक्रमासंदर्भातील सविस्तर माहीती प्रथमतः आक्टोंबर २०२३ साली मागीतली पून्हा नोव्हेंबर २०२३ ला अपिल केले परंतू त्याच वर्षी डीसेंबर आणी जानेवारी २०२४ आणी १४ ऑगस्ट २०२४ ला प्रत्यक्ष बोलावले परंतू, कांहीतरी कारणे सांगूण माहीती देण्यास टाळाटाळ करीत असल्याने गैरप्रकाराला पांघरुण घालत असल्याचे स्पष्ट होते तरी ही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सामाजीक न्याय विभाग लक्ष्य घालीत नाही यातील गौडबंगाल काय ?

दुसरा – अरे, शासन आणी विरोधी लोकप्रतिनिधीतला कलगीतूरा संपत नाही, त्यामूळे प्रशासन मोकळे बनते. अधिकारी संबंधीत योजनाचा बट्ट्याबोळ करतात. मग असे गैरप्रकार आणी वास्तव माहीतीसाठी टाळाटाळ करणे हेच न्यायीक व पारदर्शक कारभार म्हणायचा दुसरे काय.

एक – अहो, महाराष्ट्र शासन एक आदर्शवत प्रशासन राबविते. महाराष्ट्रभूमी, महाराष्ट्र शासन ही भारताची आर्थीक राजधानी आहे. मग महाराष्ट्र सरकारच असे गैरप्रकार, प्रशासकीय गोंधळ करीत असेल तर दाद कोणाकडे मागावे हेच कळत नाही.

दुसरा – अरे, शासनाचा आंधळा, सावळा गोंधळी कारभार आहे. प्रशासनच हात धूवुन निघतेय. अर्थात आंधळं दळतं, कूत्रं पीठ खातं अशीच शासन, प्रशासनाची अवस्था आहे. मग न्याय, विकास, पारदर्शकतेच काय घेवून बसलास.

# लाडकी बहीण... महाराष्ट्राचे काय ?

## संपादकीय...

पुरुषाबरोबर महिलानाही समान संधी देणे, त्यांची उन्नती करणे, घराबरोबरच, समाजात, राजकारणात, अर्थकारणात, सत्ताकारणात समान संधी, न्याय व हक्क देण्याविषयीची तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्य घटनेतच करुन ठेवलेली आहे या बाबीचा अनादर भारताचे स्वतंत्र भारताचे पहिले, वहिले पंतप्रधान पंडीत जवाहर लाल नेहरु यानी भारताचे पहिले कायदा मंत्री आणी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी मांडलेल्या महिला विषयीच्या हिंदू कोडबिलास विरोधी केला असला तरी धर्मनिरपेक्ष, पूरोगामी महाराष्ट्राच्या, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या सत्ताधारी सरकारने अर्थात शिंदे, फडणवीस, पवार सरकारने महिलाना लाडकी बहीण समजून जे कांही मानधन रक्कम दुप्पट करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणी उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यानी घेतला आहे तो स्वागतार्ह आहेच पण त्यातून महाराष्ट्राचे भवितव्य काय असेल अशी शंकास्पद प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेतून उमटताना दिसते आहे.

सरसकट ढोबळ भाषेत सांगायचे झाल्यास स्त्रि, महिला ही कोणत्याही जाती, धर्माची असली तरी ती भारतासह जगातील मानवी समूहाची जननी आहे निर्माती आहे. त्या, त्या महिलेस पुरुष, स्त्रि असा हा भेद नाहीच पण प्राचीन, अर्वाचीन, मध्ययूगीत काळापासून मनु, हिंदू संस्कृती पासून महिलेची चेष्टाच करुन तिला मूलं, बाळात, घरात दडवून ठेवून तिला गुलामगिरीतच ठेवलेले आहे पण भारत स्वतंत्र झाला आणी तमाम महिलानी मोकळा श्वास सोडला. संविधानाने धिर, आश्रय, आधार दिला पंरतू ती आजवर पिडीत, शोषित, वंचित अन्यायग्रस्तच आहे कारण पुरुष प्रधान संस्कृतीने महिलेला डोके वर काढूच दिले नाही आणी मग पुन्हा राजकीय पक्षानी सत्तासंघर्षाच्या नादात महिलाना महत्व देण्याचा प्रयत्न केला. अनेक महिलानी धीरगंभीर विचारातून सत्ताकारण केले, करीत आहेत पण त्याच महिला राज्यकर्त्याना आमचा वाटा कूठं आहे रे म्हणून जाब विचारत असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या बेरकी चालीतून महाराष्ट्र सरकारने उद्याच्या सत्तेसाठी नौटंकी करुन लाडकी बहीण योजना जाहीर केली ती कार्यान्वीत केली पंरतू तितही तांत्रीक अडचणी निर्माण करुन सरकारच लाडक्या बहीणीची आधूनिक,वाजवी, न्यायीक पध्दतीने अडवणूक करुन आम्हीच खरे न्यायीक सत्ताधारी शिंदे, पवार, फडणवीस आहोत अशी भूरळ घालीत असल्याची टीका विरोधी पक्षनेत्याकडून होत आहे ती अनाठाई नसावी असे वाटते.

काल राखी पोर्णिमा, रक्षाबंधन होते त्यास पौराणीक संदर्भ असला तरी तो थोतांड असावा अशीच चर्चा विचारवंतात होत असली तरी रक्षा बंधनदिवशीच्या निमित्ताने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यानी मिस्किलपणे राखी बांधण्यासाठी एवढ्या संख्येने महिलानी माझे हात ओढले, ओढतील ते मला कळत नाही. कारण माझ्या बायकोने एवढ्यावेळा हात ओढले नसतील असे उद्‌गार काढल्याची बातमी एका नामांकित दैनिकात छापून आल्याची चर्चा सर्वत्र होत असून मतदार भगिणीना, बहीणीला केवळ आर्थीक आस दाखवून तसा हेतूपुरस्कर्त लाभ देवून केवळ सत्ता हस्तगत करणे एवढाच असावा ही बाब लाजीरवाणी असून लाडक्या बहीणीचा, असंख्य महिलाचा केवळ सत्तेसाठी वापरकरणारे शिंदे,पवार,फडणवीस हवेत की महिला, पुरुषाना बरोबरीने घेवून चालणारे सहकार हवे हा काळच ठरविल पंरतू लाडक्या बहिणीचे ठीक पण महाराष्ट्राचे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

# बहिण-भावांचे पवित्र रक्षाबंधन पहाता; वृक्षलागवडीच्या बंधनात सर्वांनीच सहभाग घ्यावा.

रक्षाबंधन हा सण भावाबहिणींचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो. राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे.यामुळे बहिण–भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते. उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्रि्चम भारतामध्येनारळी पौर्णिमाया नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला. तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी जान जाये पर वचन न जायेअशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण –भावाच्या अतुट बंधन.म्हणजेच बहिण–भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो.यामुळे बहिण –भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण –भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील पृथ्वी शाबूत रहाली तर मानव व संपूर्ण जीवजंतू सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे. कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे कठीण झाले आहे व काही पशुपक्षी वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु हवामानात बदल झाल्याने मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे प्रमाणा सुध्दा वाढले आहे.यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी,भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात.परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक –एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे.कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळते.त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण–भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकांना सरकारने एक–एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे व निसर्गाला वाचविले पाहिजे.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# शिक्षकाची बदलती भूमिका

शिक्षण हा मानवजातीच्या प्रगतीचा आधारस्तंभ आहे. गेल्या काही दशकामध्ये शिक्षण क्षेत्रात नाना बदल झाले आहेत,ज्यामुळे शिक्षकांची भूमिका देखील बदलली आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतींच्या अगदी उलट, आजच्या काळात शिक्षक फक्त ज्ञानाचे वाहक नसून,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक मार्गदर्शक,सल्लागार आणि प्रेरणास्थान म्हणून काम करत आहेत.बदलत्या समाजाच्या गरजांनुसार शिक्षकांनी त्यांच्या शिक्षणशास्त्रात समायोजन करणे,तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाची गुणवत्ता सुधारणा करणे,आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व भावनिक गरजांकडे लक्ष देणे हे अत्यंत आवश्यक झाले आहे.अशा या बदलत्या भूमिकेला समजून घेणे आणि त्यातील नवे पैलू उलगडणे हे शिक्षण क्षेत्राच्या भविष्याकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरते. याच बदलत्या भूमिकेचा विचार करून हा लेख शिक्षकाच्या बदललेल्या भूमिकेवर प्रकाश टाकतो आणि आधुनिक शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांची नवी परिभाषा स्पष्ट करतो.

पारंपरिक भूमिकापूर्वी शिक्षकाची भूमिका मुख्यत्वे शिकविणे आणि विद्यार्थ्यांना शिस्त लावणे यापुरती मर्यादित होती. शिक्षक ज्ञानाचा एकमात्र स्रोत म्हणून पाहिले जात होते आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिकवणीला निःशब्दपणे स्वीकारणे अपेक्षित होते.या पारंपरिक भूमिकेत शिक्षक विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांकडे फारसे लक्ष देत नसत. नव्या युगातील बदलआधुनिक तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड बदल झाले आहेत.इंटरनेट,स्मार्टफोन्स,आणि विविध डिजिटल साधनांमुळे ज्ञानाचे स्रोत बहुपदरी झाले आहेत.परिणामी,शिक्षकांनी आपली पारंपरिक भूमिका बदलून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे,सल्लागार आणि सर्जनशीलता विकसित करणारे म्हणून काम करणे आवश्यक झाले आहे.

शिक्षकाची नवीभूमिका

मार्गदर्शक:आधुनिक काळात शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणारे नसून त्यांना स्वयंपूर्ण बनविणारे मार्गदर्शक म्हणून काम करतात.विद्यार्थ्यांना विविध ज्ञानस्रोतांचा योग्य वापर करून आपले शिक्षण घडविण्याची प्रेरणा देतात.

सल्लागार: शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आणि शैक्षणिक समस्यांकडे अधिक लक्ष द्यावे लागते.विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करणे, त्यांना योग्य सल्ला देणे आणि त्यांची भावनिक गरजांची पूर्तता करणे हे शिक्षकांच्या नव्या भूमिकेत महत्त्वाचे झाले आहे.

तंत्रज्ञानाचा वापर: शिक्षण तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सुसंगत आणि प्रभावी बनविणे हे शिक्षकांचे नवे आव्हान आहे. विविध ॲप्स, सॉफ्टवेअर,आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर करून शिक्षण अधिक आकर्षक आणि सुलभ करता येते. सर्जनशीलता आणि नवीनता: शिक्षकांनी आपल्या शिक्षणपद्धतीत सर्जनशीलता आणणे गरजेचे आहे.विविध प्रकल्प,समूहचर्चा,आणि इतर सर्जनशील क्रियाकलापांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविणे अधिक प्रभावी ठरते.

शिक्षकाची बदलती भूमिका ही शिक्षण क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अनिवार्य बदल आहे. पारंपरिक पद्धतींपासून दूर जाऊन,शिक्षकांनी अधिक व्यापक आणि समग्र दृष्टिकोन स्वीकारला आहे.शिक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे शिक्षकांची भूमिका मार्गदर्शक,सल्लागार,आणि सर्जनशीलता विकासक म्हणून विस्तारित झाली आहे.आधुनिक काळात शिक्षक हे केवळ ज्ञानाचे स्रोत नसून विद्यार्थ्यांना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारे असतात.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक,सामाजिक आणि भावनिक गरजांकडे लक्ष देणे हे शिक्षकांचे प्रमुख कार्य झाले आहे.त्यामुळे शिक्षकांना अधिक संवेदनशील आणि समजूतदार बनणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शिक्षण अधिक सुलभ, सर्जनशील आणि सुसंगत झाले आहे. डिजिटल साधनांचा वापर करून शिक्षक विद्यार्थ्यांना अधिक आकर्षक आणि प्रभावी पद्धतीने शिकवू शकतात. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारली आहे आणि विद्यार्थ्यांची शिकण्याची रुची वाढली आहे.शिक्षकांनी आपल्या शिक्षणपद्धतीत सर्जनशीलता आणणे अत्यंत गरजेचे आहे. विविध प्रकल्प,समूहचर्चा,आणि इतर सर्जनशील क्रियाकलापांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविणे अधिक प्रभावी ठरते. यामुळे विद्यार्थ्यांचे सर्जनशील विचारशक्ती आणि समस्या सोडविण्याच्या कौशल्यांचा विकास होतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या केवळ शैक्षणिक यशावरच नव्हे, तर त्यांच्या सर्वांगीण विकासावर देखील लक्ष द्यावे. मानसिक आरोग्य, सामाजिक कौशल्ये,आणि नैतिक मूल्ये यांचा विकास करण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.शिक्षकांची बदलती भूमिका ही केवळ विद्यार्थ्यांच्या हितासाठी नव्हे,तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी देखील अत्यंत महत्त्वाची आहे.या नव्या भूमिकेतील शिक्षक हे शिक्षणाच्या भविष्याचा आधारस्तंभ आहेत.त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना एक उज्वल आणि सक्षम भवितव्य निर्माण करण्याची संधी मिळते.त्यामुळे शिक्षकांनी या बदलत्या भूमिकेला स्वीकारणे आणि आपल्या कार्यात नव्या कल्पनांचा समावेश करणे हे अत्यंत गरजेचे आहे.शिक्षक हे समाजाच्या प्रगतीचे दिशादर्शक आहेत. त्यांच्या बदलत्या भूमिकेमुळे शिक्षण क्षेत्र अधिक सुसंवादी, सर्जनशील आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त बनले आहे. त्यामुळे, शिक्षकांचा बदलती भूमिका ही शिक्षणाच्या क्षेत्रातील एक स्वागतार्ह आणि आवश्यक पाऊल आहे.

**डॉ.आशा अशोक ब्राह्मणे ८१०८८२०४५४**
**आदर्श शिक्षिका(बी एम सी)**
**मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूल मालाड(प) मुंबई**

# काय बोलता राव ?

ओबीसीतूनच मराठा आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकार घेवूच शकत नाही. त्यासाठी विधीमंडळात ठराव पास करुनच तो केंद्र शासनाकडे पाठवावा लागतो तो ही कायद्यात बदल करुनच घ्यावा लागतो परंतू ५० टक्क्यापूढे आरक्षण देता येत नाही हा हिवराचा मेख असल्याने शिंदे सरकार राष्ट्रवादी शरद पवार यांचेवर जरांगे पाटील याना चेतावणी दिल्याचा आरोप करुन आरक्षणावरुन जनतेचे लक्ष्य विचलित करण्यासाठीच लाडकी बहीण योजना कार्यान्वीत केल्याचा आरोप जाणकारासह राष्ट्रवादी कॉग्रेस शरद पवार गटाकडून केला जातो आहे.

**काय बोलता राव,**

ओबीसीतून मराठा आरक्षण देणे शक्यच नाही हे वास्तव सत्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना ज्ञात असतानाही त्यानी मराठा आरक्षणाचे घोडे पळविले, मराठा समाज खवळला, जरांगे पाटील यांनी ताठरं भुमिका घेतली मग शरद पवाराना पूढे करुन डाव उढविण्याचा प्रयत्न सुरु झाला पंरतू खूद्द शरद पवार यानीच मराठा आरक्षण लागू करा आम्ही पाठींबा देवू आमचा विरोध असणार नाही असे स्पष्ट करतात जनतेला हूलकावणी देण्यासाठी,आरक्षणावरुन विधानसभा निवडणूका होईपर्यंत दुर्लक्षीत करण्यासाठी लाडकी बहीण योजनाचे सोंग केले ते कार्यान्वीत केले पूढे काय ते काळच ठरविल पण आरक्षणाचे घोंगडे जड बनते आहे मग बोला दाजीबा !

# अनुसूचित जाती व जमातींसाठी क्रिमी लेअर असंविधानीक सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता डॉ.के.एस.चौहान यांचे आरक्षण परिसंवादात प्रतिपादन

विशेष प्रतिनिधी नागपूर – दविंदर सींग विरूद्ध पंजाब राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधिशांच्या पीठाने दिलेला निर्णय हा न्यायिक प्रतिबद्धतेचे उल्लंघन करणारा आहे. विषय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना शैक्षणिक व सेवा विषयक आरक्षणामध्ये उप वर्गीकरण करणे संविधानीक रीत्या वैध आहे किंवा नाही हे ठरविणे होते.परंतु विषय वर्गीकरणाचा असताना सर्वोच्च न्यायालयाने क्रिमी लेअर लावण्याचा दिला;असे विचार सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता डॉ.के. एस. चौहान यांनी व्यक्त केले. स्वतंत्र मजदूर युनियन तर्फे हजारी पहाड नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित आरक्षण परिसंवादांत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी विचारमंचावर विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात आणि स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.के. पी.स्वामीनाथन हे उपस्थित होते.अध्यक्षस्थानी स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.एस. पाटील हे होते.



डॉ.के.एस चौहान पुढे म्हणाले,अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना क्रिमी लेअर लावण्याबाबतची मागणी इंदिरा सहानी या नऊ न्यायाधिशांच्या पीठाने सन १९९२ साली नाकारली आहे.असे असताना सात न्यायाधिशांचे पिठ त्याविरोधात कसा निर्णय देऊ शकते? असा प्रश्न उपस्थित केला.

भारत सरकारचे कायदा मंत्री अर्जून मेघवाल यांच्या अलिकडील विधानाचा समाचार घेताना ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा कायद्यामध्ये रूपांतरीत होत असतो. क्रिमी लेअर आणि वर्गीकरण याबाबतचा निर्णय केवळ बोलून त्यामध्ये सुधारणा होणार नाही; तर त्यासाठी अशाप्रकारे अनुच्छेद ३४१ व ३४२ मध्ये घटना दुरुस्ती करावी लागेल. कायदा मंत्री यांचे विधान केवळ राजकीय स्वरूपाचे असून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे मध्ये निर्माण झालेला असंतोष थांबविण्यासाठी आहे. अनुसूचित जाती मधील काही लोकांमध्ये जाणिवपूर्वक गैरसमज निर्माण करण्यात आले आहेत. त्यांचे योग्य प्रबोधन करण्याची गरज आहे.कारण पदोन्नती मधिल आरक्षण अगोदरच बंद करण्यात आले आहे व या निर्णयामुळे सरळ सेवा भरती मधील आरक्षण सुध्दा संपुष्टात येणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व दलित आदिवासी समाजातील सामाजिक व आर्थिक प्रश्नांचे अभ्यासक डॉ.सुखदेव थोरात आपल्या प्रमुख मार्गदर्शनातून म्हणाले की,अनुसूचित जमाती व जमाती यांच्या आरक्षणाचा आधार हा जातीय भेदभाव हा आहे.अनेक अभ्यासातून समोर आले आहे की जातीय भेदभाव हा वरच्या पदावर ज्यास्त वाढतो अनुसूचित जाती व जमाती मधील अधिकाऱ्यांना कोटा वाला म्हणून हिणवले जाते.आजच्या परिस्थितीत विद्यापीठांसह वरिष्ठ पदांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा अनुशेष भरलाच गेला नसताना व काही जातींचेच वरिष्ठ नोकऱ्यांमध्ये ज्यास्त प्रतिनिधीत्व आहे हे कुठल्याही वैज्ञानिक आकडेवारी द्वारे सिद्ध झाले नसताना अशाप्रकारचा निर्णय हा गैरसमजातून आधारित असल्याचे ते म्हणाले.

महिला आरक्षण हे लिंग भेदावर आधारित आहे,आर्थिक भेदभावावर नाहीतसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण हे अस्पृश्यता व सामाजिक भेदभाव यावर आधारित असल्याने त्याला आर्थिक आधार जोडता येत आहे,असेही डॉ. थोरात म्हणाले. प्रास्ताविक नरेंद्र जारोंडे यांनी केले संचालन गणेश उके यांनी केले तर आभार विकास गौर यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक,वकील, अधिकारी व अनेक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सागर तायडे यांस कडून

# भविष्यातील पिढी वाचवायचे काम महिलाच करु शकतील : पाशा पटेल

लातुर : पृथ्वी आई आहे, आणि त्या आईची



काळजी घेणारी आई म्हणजे बाई आहे, म्हणून महिलांनी आता पृथ्वी रक्षणासाठी कंबर कसली आहे, भविष्यातली पिढी वाचवायचं काम या महिलाच करू शकतील, अशा शब्दात राज्य कृषी मुल्य आयोग (कॅबिनेट) आणि मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी महिलांचा गौरव केला.

उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालूका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती, लातूर अंतर्गत समृध्दी महिला प्रभाग संघ भातांगळी ता. जि. लातूर यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष स्थानावरुन ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजीराव काळगे उपस्थित होते.

यावेळी झालेल्या अध्यक्षीय भाषणात पाशा पटेल म्हणाले,लढाईमध्ये कुणी जिंकू कुणी हरु अर्थात अनाथ होतात दोन्ही बाजूच्या बहिणी. मारणारा जेलमध्ये जातो मरणारा स्वर्गात जातो. दोन्ही संसार उघड्यावर पडतात आणि ती सावरायची जबाबदारी शेवटी बाईवरच पडते. त्यातल्या त्यात **(पान ४ वर)** ...

# प्रा.लक्ष्मण हाके यांचा नागनाथ घीसेवाड यांच्या संपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार

भोकर– ओबीसी आरक्षण बचाव चळवळीचे योद्धे प्रा.लक्ष्मण



हाके यांचा बहुजन ओबीसी नेते नागनाथ घिसेवाड यांच्या संपर्क कार्यालयात सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

भोकर येथे १८ ऑगस्ट रोजी ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यास प्रा.लक्ष्मण हाके हे प्रमुख वक्ते म्हणून हजर होते,सभेनंतर भोकर विधानसभा मतदारसंघाचे बहुजन ओबीसी नेते नागनाथ घिसेवाड यांच्या संपर्क कार्यालयात प्रा.लक्ष्मण हाके यांचा पुष्पहार शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी नागनाथ घीसेवाड यांनी भोकर विधानसभा मतदारसंघात तीन वेळा विधानसभा निवडणूक लढवून ओबीसी बहुजन समाजाची वज्र मुठ बांधली होती,त्यांचा अल्पशा मतांनी पराभव झाला पुन्हा नव्या जोमाने ते ताकदीनिशी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी तयार आहेत सर्वसामान्य लोकांची इच्छा देखील आहे असे मत उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केले, बहुजनांच्या ओबीसींच्या विचारांची माणसं निवडणुकीसाठी आता सज्ज झाली पाहिजेत आणि सर्वांनी एकजुटीने त्यांना मदत केली पाहिजे असे मत प्रा.लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले, यावेळी नागनाथराव घीसेवाड,नामदेवराव आयलवाड, ओबीसी नेते नागोराव शेंडगे,बी.आर.पांचाळ,सुभाष नाईक ज्येष्ठ पत्रकार एल.ए .हिरे,सिद्धार्थ जाधव,बालाजी राठोड,ॲड.परमेश्र्वर पांचाळ, दत्ता बोईनवाड, गितेश बोटलेवाड, प्रकाश बोंदीरवाड,माधव सलगरे, गणेश आरलवाड ,गोविंद गिरी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# भोकरमधून उमेदवारी देणार नाना पटोले यांनी दिलेल्या शब्दावर माझा पूर्ण विश्र्वास - अरुण चव्हाण

**भोकर / सिद्धार्थ जाधव / काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये नुकतेच गौर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुण चव्हाण यांनी सामाजिक चळवळीतून प्रथमच राजकारणात उडी घेत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.या पक्ष प्रवेशा नंतर प्रथमच भोकर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मत व्यक्त करताना म्हणाले मी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यापूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्याशी सविस्तर चर्चा केल्याने त्यांनी मला भोकर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी देणाचा शब्द दिल्याने मी काँग्रेस पक्षात पक्ष प्रवेश केला.काँग्रेस पक्षाच्या एका वरिष्ठ व जबाबदार व्यक्तीने मला शब्द दिल्याने उमेदवारी मलाच मिळणार आहे असा विश्र्वास दाखवत मी भोकर विधानसभेच्या तयारीला लागलो असून पूर्ण ताकतीने ही निवडणूक लढविणार असल्याचे अरुण चव्हाण यांनी मत व्यक्त केले.**



आगामी होत असलेल्या विधासभा निवडणुकीत भोकर विधानसभा मतदार संघाकडे संबंध जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागून आहे. भोकर मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडे अनेक दिग्गज नेत्यांनी उमेदवारी मागितली आहे. आता यात भर पडत गौर सेनेचे राष्ट्रीय अरुण दिगंबर चव्हाण यांनी देखील भोकर विधानसभा मतदार संघातून निवडणूक काँग्रेस पक्षाने संधी दिल्यास आपण लढविणार असल्याची इच्छा व्यक्त केली तशी मागणीही त्यांनी पक्षाकडे केली असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी माझा काँग्रेस प्रवेश करून घेण्यापूर्वी मला भोकर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी देणार आल्याचा शब्द दिल्याने मी प्रथमच कोणत्या राजकीय पक्षात प्रवेश केला आहे.मला या वरिष्ठ व जबाबदार नेत्यांनी दिलेल्या शब्दावर पूर्ण विश्र्वास असून मी भोकर मतदार संघाची निवडणूक पूर्ण ताकतीने लढविणार आहे असे मत गौर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुण चव्हाण यांनी भोकर येथील शासकीय विश्राम गृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी पत्रकारांनी काँग्रेस पक्ष प्रवेशा बदल प्रश्र्न विचारले असता अरुण चव्हाण म्हणाले की, माझी गौर सेनेच्या माध्यमातून चालू असलेल्या सामाजिक चळवळीला गती देण्यासाठी एक राजकीय बळ सोबत घेऊन एक पाऊल पुढे टाकत बहुजन समाजाला न्याय मिळून देण्याचा चंग उराशी बाळगत प्रस्तापितांविरुद्ध लढा देण्या करिता धर्मनिरपेक्ष विचारसरणीच्या आधारे संपूर्ण देशाच्या विकासाचा आराखडा घेऊन काँग्रेस पक्षाने आजतागायत कार्य केले आहे.काँग्रेस पक्षाची हीच ध्येय धोरणे नव्या पिढीतील युवकांना, पक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे ओळख करून तळागाळातील घटकापर्यंत नेवून या शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्याचे माझे उदिष्ट असल्याचे मत व्यक्त केले.

अरुण दिगंबर चव्हाण यांचा जन्म भोकर तालुक्यातील चिदगिरी तांडा येथे झाला. बंजारा समाजाच्या हालअपेष्ठा यांनी जवळून पहिल्या आहेत.वाड्यातांड्यात, गावकुसा बाहेर राहिलेला हा समाज आजही विकासापासून कोसो दूर आहे. आपल्या समाजाला न्याय मिळून देण्यासाठी,समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अरुण चव्हाण यांनी गौर सेनेची स्थापना केली आणि या गौर सेनेच्या माध्यमातून समाजाला एक संघटित करून गेल्या अनेक दशकांपासून गौर–बंजारा, बहुजन समाजाला न्याय मिळून देण्याची चळवळ उभी केली. गौर बंजारा सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुण चव्हाण हे महाराष्ट्रच नव्हे तर तेलंगणा, अंद्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, बिहार आदींसह देशातील अनेक राज्यात बंजारा समाजाची चळवळ उभा केली. ही चळवळ मोठया जोमाने, मोठ्या हिमतीने कार्य करत पुढे चालवी व या सामाजिक चळवळीला राजकीय बळ मिळावे आणि या बाळाच्या आधारे बंजारा,बहुजनांवर प्रस्तापितांकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरुद्ध लढा उभारावा असा दृढ संकल्प करून राजकीय बाळाच्या शोधात अरुण चव्हाण काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्याशी चर्चा करून यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून भोकर विधानसभा मतदार संघाची उमेदवारी देण्याच्या शब्दार मी काँग्रेस पक्ष प्रवेश केला आहे. मला त्यांच्या शब्दावर पूर्ण विश्र्वास असून मला उमेदवारी मिळणार या अपेक्षेने हा विश्र्वास दाखवीत मी भोकर विधानसभेच्या रिंगणात उतरणार आहे आणि या प्रस्तापितांविरुद्ध पूर्ण ताकतीने मी निवडणूक लढविणार आल्याच्या भावना व्यक्त केल्या.

# आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांनी आपसी मतभेद विसरून मोक्याच्या जागेचे रक्षण करावे -भगवान साळवे.

मुंबई : मुंबई मध्ये अनेक ठिकाणी मोक्याच्या जागा



कार्यकर्त्यानी पकडून त्या ठिकाणी कार्यालय,वाचनालय काढली होती. सुरवातीला ती साधे पत्रे लावून बांधण्यात आली होती. तेव्हा कार्यकर्ते व समाज संघटित होता. त्यामुळे त्याचे कायमस्वरूपी बांधकाम करून ते लक्षवेधी आणि येणाऱ्या तरुण पिढीला प्रेरणादायी ठरत होते. राजकीय सत्ता स्पर्धेत कार्यकर्ते वेग वेगळ्या विचारांच्या नेत्या सोबत गेल्या मुळे कार्यकरत्यात मतभेद निर्माण झाले.त्याचा फायदा त्या मोक्याच्या जागा ताब्यात घेण्यासाठी भाई गिरी,दादागिरी राजकीय आशीर्वादाने वाढली. अनेक कार्यकर्ते भांडणे नको म्हणून गप्प बसले आणि समाज सुद्धा त्यामुळेच गप्प बसला.हे आपल्या क्रांतिकारी विचारांच्या चळवळीचे मोठे दुर्दव आहे. अशी खंत आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते नेते भगवान साळवे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकता विकास वाचनालय केदारे चौक (गाढव नाका) भांडुप येथे ध्वजारोहण सोहळ्या प्रसंगी व्यक्त केली.

भांडुप विभागातील सर्व सामाजिक,धार्मिक राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते नेते ध्वजारोहण सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहिले आणि आम्ही एक आहोत एक होऊ शकतो हा संदेश यामुळेच सर्व प्रकारचा विरोध करणाऱ्यांना गेला याचे मला समाधान वाटले असे भगवान साळवे यांनी सांगितले.एड.वैशाली सीरसाठ,सीमा इंगळे विश्र्वास सरदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करतांना विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास एकता मंच वाचनालयांचे कार्य करणारे जेष्ठ नेते प्रा. जगन्नाथ बाबा,भगवान साळवे,विजय माने,दिलीप गायकवाड, सुनील साळवे, बापू गायकवाड, बबन थोरात,चंदू बनकर,शरद वाघ त्याच बरोबर पत्रकार साहित्यिक कामगार नेते सागर तायडे,ईशान्य मुंबई जिल्हा अध्यक्ष विश्र्वस भाऊ सरदार,उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडीचे ईशान्य मुंबई रमेश भाई सांगारे, ज्येष्ट साहित्यिक लक्ष्मण देठे,आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ट नेते मारुती कांबळे,रिपब्लिकन सेनेचे विजय माने,वंचित चे तालुका अध्यक्ष सुभाष मांदळे,वंचित महिला आघाडी अध्यक्ष अनिता कांबळे,योगेश मोठे,चंद्रकांत गायकवाड, प्रवीण आंबोरे,सिरसाठ, गौतम मोरे कवी गायक,सीमा ताई इंगळे महिला अध्यक्ष वॉर्ड क्रमांक ११४,नागेश खैरमोडे अध्यक्ष वॉर्ड क्रमांक ११३,जितेंद्र थाटे,अनिता गायकवाड,गणेश तायडे, प्रभाकर काळे,भांगे संभाजी काशीद,नम्रता सुरवसे,उषाताई सोनवणे,लताताई नलावडे,पंचशीला आणि टेम्पो चालक मालक संघटना,फेरीवाला संघटना पदाधिकारी व सर्व नाका कामगार नाक्यावरील सर्व समाज मंडळातील आजी माजी पदाधिकारी यांच्यावतीने हा कार्यक्रम मोठ्या उत्सवात व जोश पूर्ण करण्यात आला.स्थानिक रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजय माने यांनी सूत्र संचालन केले तर जीवन खरात यांनी आभार मानले. गौतम मोरे भांडुप यांस कडून

# परळी वैद्यनाथ येथे २१ ते २५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीतराज्यस्तरीय कृषी महोत्सव २०२४ चे आयोजन

लातूर, : २१ ते २५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कॉटन मार्केट यार्ड नाथ रोड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव २०२४ आयोजित करण्यात आला आहे.

कृषी महोत्सवामध्ये कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, कृषी विद्यापीठे दालन, परिसंवाद , चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केंद्र, विक्रेता , खरेदीदार संमेलन शेतकरी सन्मान समारंभ, सेंद्रिय शेतीमाल विक्री, रानभाजी महोत्सव, आधुनिक कृषी अवजारे प्रदर्शन, स्वंयसहाय्यता महिला बचत गट निर्मित वस्तू पदार्थांचे विक्री व प्रदर्शन असे विविध प्रकारचे स्वतंत्र दालन व चर्चासत्र आयोजित करण्यात आलेली आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांनी राज्यस्तरीय कृषी महोत्सवामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर.टी. जाधव यांनी केले आहे.

# सोयाबीनवरील विषाणूजन्य हिरवा आणि पिवळा मोझॅक रोगाचे व्यवस्थापन

लातूर, (जिमाका) : सद्यास्थितीत मराठवाड्यातील बऱ्याच भागात सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक तसेच काही ठिकाणी हिरवा मोझॅक म्हणजेच केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. पिवळा मोझॅक हा रोग मुंगबीन यलो मोझॅक वायरस या विषाणूंमुळे होतो. तर हिरवा मोझॅक हा सोयाबीन मोझॅक वायरस या विषाणूमुळे होतो. कडधान्य आणि तणे ही या रोगाची पर्यायी यजमान पिके आहेत. या विषाणूजन्य रोगामुळे सोयाबीनमध्ये १५ ते ७५ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. शेतकऱ्यांनाही या रोगाची लक्षणे ओळखुन एकात्मिक व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

हिरवा मोझॅकची लक्षणे

झाडाची पाने ही जाडसर, आखूड तसेच कडक होतात व खालच्या बाजूने सुरकुतलेली किंवा मुरगळलेली असतात. पाने साधारण पानांपेक्षा जास्त गर्द हिरव्या रंगाची दिसतात. प्रादुर्भावामुळे झाडाची वाढ खुंटते. हा विषाणू बियाणे व पानातील रसामार्फत पसरतो आणि हा प्रसार मुख्यतः मावा या रसशोषक किडीद्वारे केला जातो.

पिवळा मोझॅकची लक्षणे

सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरीपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे चट्टे अथवा अनियमित पट्टे दिसतात त्यानंतर पाने जसे जसे परिपक्व होत जातात, तसे तसे त्यावर गंजलेले तांबूस रंगाचे चट्टे दिसतात. काही वेळा जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरुंद होतात व मुरगळतात. लहान अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पूर्ण झाड पिवळे पडते. हा विषाणू पानातील रसामार्फत पसरतो आणि हा प्रसार पांढरी माशी या रसशोषक किडीद्वारे होतो.

रोगास कारणीभूत घटक

केवडा रोग उबदार तापमान, अति दाट पेरणी या रोगाच्या वाढीस कारणीभूत ठरते.आद्र हवामानात हा रोग वाढत जातो.

नुकसानीचा प्रकार

दोन्हीही प्रकारच्या मोझॅकमुळे झाडाच्या अन्न निर्मिती प्रक्रियेमध्ये बाधा होऊन, अशा प्रादुर्भावग्रस्त झाडांना कालांतराने फुले आणि शेंगा कमी लागतात. त्यातील दाण्यांचा आकार लहान राहतो किंवा संपूर्ण शेंगा दाणे विरहीत राहून पोचट होतात. पर्यायाने उत्पन्नात मोठी घट येते. तसेच दाण्यांमधील तेलाचे प्रमाण घटते तर प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होते.

सोयाबीनवरील पांढरी माशी, मावा आणि मोझॅक विषाणूचे एकात्मिक व्यवस्थापन

काही सोयाबीन पिकाचे वाण या रोगास लवकर आणि जास्त प्रमाणात बळी पडतात. त्यामुळे या रोगास बळी पडणाऱ्या वाणाची लागवड न करता आपल्या भागात विद्यापीठाद्वारे शिफारस केलेल्या सोयाबीन वाणांचीच लागवड करावी. पेरणीस निरोगी बियाण्याचाच वापर करावा. लागवडीनंतर वेळोवेळी पिकाचे कीड व रोगांसाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे. मोझॅक (केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच, ती वेळोवेळी तात्काळ समूळ काढून बांधावर न फेकता जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट करावीत. जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये १२ इंच ुँ १० इंच आकाराचे हेक्टरी १० ते १५ पिंवळे चिकट सापळे लावावेत. नत्रयुक्त खताचा संतुलित वापर करावा. मूग, उडीद यासारख्या पर्यायी खाद्य वनस्पतीवरून पिवळा मोझॅक रोगाचा प्रसार रोखण्यासाठी अशा पिकावरील पांढरी माशीचे व्यवस्थापन करावे. पीक तणमुक्त ठेवावे. ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

रोगाच्या प्रसारास कारणीभूत असलेल्या मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून असिटामिप्रीड २५ टक्के + बाइफेन्थ्रीन २५ टक्के डब्ल्यू जी १०० ग्रॅम (५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) (लेबल क्लेम कीटकनाशक) किंवा थायमिथोक्झाम १२.६ टक्के आणि लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६ टक्के झेडसी ५० मिली (२.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) (लेबल क्लेम नाही) यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर या प्रमाणात करावी.

कीटकनाशकाचे प्रमाण साध्या पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर परत एकदा कीटकनाशकांची फवारणी करावी. फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा सामू ५ ते ७ असावा, शेतात कीटकनाशकाचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना चष्मा, हातमोजे, तोंडावर मास्क व संरक्षित कपड्याचा वापर करावा तसेच घुटका, तंबाखु खाऊ नये व बीडी पिऊ नये. बिगर हंगामी सोयाबीनची लागवड शक्यतो टाळावी जेणेकरून किडीच्या जीवनक्रमात खंड पडतो आणि पुढील हंगामात पर्यायाने किडींचा प्रादुर्भाव कमी राहतो, असे कृषि विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# भोकर तालुका सरपंच संघटनेच्या अध्यक्षपदी मारोती भोंबे उपाध्यक्ष राघोबा पा. सोळंके

भोकर – भोकर तालुका सरपंच संघटनेची नूतन



कार्यकारिणी दिनांक १९ ऑगस्ट रोजी घोषित करण्यात आली असून सरपंच संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी मारोती भोंबे यांची तर उपाध्यक्षपदी राघोबा पाटील सोळंके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सरपंच संघटनेचे यापूर्वीची कार्यकारिणी तालुकाध्यक्ष माधव अमृतवाड असलेली बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर काल सोमवार दिनांक १९ ऑगस्ट २०२४ ऑगस्ट रोजी येथील हॉटेल गणराज रिसॉर्ट येथे सरपंचांची बैठक घेऊन नूतन कार्यकारीनीची बिनविरोध निवडण्यात करण्यात आली यात अध्यक्षपदी मारोती भोंबे, उपाध्यक्ष राघोबा पा. सोळंके, सचिव मोहन राठोड सहसचिव दिलीप भोळे सल्लागार सुरेश पा. कल्याणकर, आनंदराव पा. रावणगावकर, जयवंतराव खूपसे, रमेश संगपवाड, सत्यनारायण कांबळे आदींची निवड करण्यात आली.यावेळी सभापती जगदीश पाटील भोसीकर, भाजपा तालुका अध्यक्ष गणेश पा. कापसे, किशोर पाटील लगळूदकर, उपसभापती बालाजी शानमवाड, संचालक रामचंद्र मुसळे, अत्रिक पा. मुंगल, उज्वल केसराळे, दिलीपराव सोमठाणकर, राजेश अंगरवार, केशव पा. पोमनाळकर आदींची उपस्थिती होती.नूतन कार्यकारिणीचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# चित्ररथाद्वारे ‘महाज्योती’च्या योजनांची होणार जनजागृती

लातूर, (जिमाका) : राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन



कल्याण विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. याबाबत जिल्ह्यात चित्ररथाद्वारे जनजागृती केली जाणार असून प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले यांनी आज या चित्ररथाला हिरवी झेंडी दाखविली. उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक शिवकांत चिकुर्ते यावेळी उपस्थित होते. राज्यातील इतर मगासवर्ग, विमुक्त जाती–भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी, युवकांसाठी ‘महाज्योती’मार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांची जनजागृती करण्यासाठी ‘महाज्योती’मार्फत चित्ररथ तयार करण्यात आला आहे. हा चित्ररथ जिल्ह्यातील ग्रामीण भागात जावून योजनांची माहिती देणार आहे.

# कपाशीवरील गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन करण्याचे आवाहन

**लातूर, (जिमाका) : कापूस पिक हे सध्या ५० ते ६० दिवसाचे झाले असून बऱ्याच ठिकाणी फुलावर येत आहे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव डोमकळ्याच्या स्वरूपात ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासुनच दिसून येत आहे. किटकशास्त्र विभागाच्या चमूने शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी दिल्या असता, अकोला, वाशिम व बुलढाणा येथील कपाशी जेथे फुलावस्थेत आहे अश्या ठिकाणी डोमकळया आढळून आल्या आहेत. बोंड अळीचा प्रादुर्भाव ५ ते ७ टक्के पेक्षा जास्त आढळून आला आहे. सततचे ढगाळ वातावरण पिकावरील किडींना पोषक असते, किडींचे व्यवस्थापन करण्यास उशिर केल्यास या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढण्याची शक्यता असते म्हणुन सुरूवातीपासुनच या किडींचे व्यवस्थापन करून या किडीमुळे होणारे नुकसान बऱ्याच प्रमाणात कमी करता येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.**

पिकातील डोमकळ्या नियमित शोधून त्या अळीसहीत नष्ट कराव्यात. दर पंधरा दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ॲझॅडिरेक्टिन ३०० पीपीएम ५० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिली प्रति १० ली पाणी याप्रमाणे फवारणी करावी. कामगंध सापळ्याचा वापर करावा. पिकाच्या उंचीनुसार किमान एक फुट उंच अंतर ठेवावे जेणेकरून कामगंध सापळ्याचा प्रभाव वातावरणात पसरण्यास मदत होईल. यासाठी एकरी दोन कामगंध सापळे लावावे. सतत तीन दिवस या सापळ्यामधे आठ ते दहा पतंग आढळल्यास गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनाचे उपाय योजावेत. तसेच मास ट्रॅपिंग करीता हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावावेत. पिक उगवणी नंतर ५५ ते ६० दिवसांनी १२ ते १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोग्रामा टॉयडीयाबॅक्ट्री किंवा ट्रायकोग्रामा चिलोनिस परोपजीवी मित्र किटकाची १.५ लक्ष अंडी (ट्रायको कार्ड) प्रति हेक्टरी सहा वेळा लावावीत.

गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक आठवड्याला एकरी शेताचे प्रतिनीधीत्व करतील अशी २० झाडे निवडून निवडलेल्या प्रत्येक झाडावरील फुले, पात्या व बोंडांची संख्या मोजून त्यात गुलाबी बोंड अळीग्रस्त फुले, पात्या व बोंडे यांची टक्केवारी काढावी व प्रादुर्भावग्रस्ताची टक्केवारी ५ टक्के पेक्षा जास्त आढळल्यास खाली सांगीतल्याप्रमाणे रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी. इंडोक्साकार्ब १४.५० टक्के एससी १० मिली किंवा स्पिनेटोराम ११.७० टक्के एससी ९ मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के इसी ३० मिली किंवा क्विनॉलफॉस २० टक्के एएफ २५ मिली किंवा क्लोरपायारीफॉस २० टक्के इसी २५ मिली यापैकी कोणत्याही एका किटकनाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

जेथे प्रादुर्भाव १० टक्केच्यावर आहे अशा ठिकाणी आवशकते अनुसार प्रादुर्भाव पुढे वाढू नये म्हणून इमामेक्टीन बेन्झोएट १.५ टक्के आणि प्रोफेनोफॉस ३५ टक्के डब्ल्यूडीजी १४ ग्रॅम किंवा सायंट्रानिलीप्रोल ८ टक्के व डायफेनथ्युरॉन ४० एससी १३ मिली किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के व सायपरमेथ्रीन ५ टक्के २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट १.१ टक्के व डायफेनथ्युरॉन ३० एससी २० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० व फेनप्रोपेथ्रिन ५ टक्के इसी ३० मिली यापैकी कोणत्याही एका मिश्र किटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

# ‘शारदा’मध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

लातूर , – येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य लक्ष्मण पुरी होते. यावेळी नवाब इस्माईल शेखदार, संस्थेचे कोषाध्यक्ष अण्णासाहेब यादव –पाटील, संजय चव्हाण, अक्षय यादव –पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन समन्वयिका अश्विनी पवार यांनी तर प्रास्ताविक रोहित जाधव यांनी केले. यावेळी मुख्य समन्वयिका अनघा पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख दर्शना देशमुख, वर्षा कांबळे, गीतांजली गिरी, रेणुका समुद्रे, नीशा पवार, ऐश्वर्या बागल, लिंबराज गायकवाड, मीरा जाधव, अंजली शर्मा, ललिता दरेकर, शीतल नडगिरे, श्वेता जाधव, अनुजा पांचाळ, रोहिणी कदम, विजयमाला सपाटे, महेश सोनवणे, दीपक काकडे आदी उपस्थित होते.

**युध्द ..**

उफाळून आलाअंती
घुसमटून ठेवला राग
मिळता जराशी वाट
भडकून उठली आग
गिळून बसेअफगाण
सुसाट तालिबाननाग
पसरे मिट्ट काळोख
विझे स्वातंत्र्य चिराग
बांगला देश पेटविला
अतिरेका आलीजाग
वणवण दाहीदिशेला
चालली भागम् भाग
इराक इस्त्रायल युध्द
तेलभडके जागोजाग
जराशी मिळता संधी
कायम फुत्कारे नाग
रशिया युक्रेन भडका
धुमसे सारखा विभाग
हल्ला भिती कायमची
कुठला न शांत प्रभाग
कायचालले जगभरात
विसरे शांतता अनुराग
वृध्दींगत होई दुश्मनी
माणूसकी वरती डाग

**नाग मित्रास..**

दिसता जरा कुठेही
कुठलाही साप नाग
टरकतात भले भले
सुरु होते भागम्भाग
आठवतात सर्पमित्र
लवकर आली जाग
सूर्योदय झाल्यावर
कोंबडा देतोय बाग
सर्प मित्र कार्य क्षम
चातुर्ये काढती माग
काळजी पूर्वक धरे
जंगला सोडती नाग
बिदागी त्यांची देता
डोक्या आमचे आग
इतके कशाला पैसे
चालते धुसफूस राग
नागसोबत घे सेल्फी
रिल्सबनवी महभाग
माणूस म्हणे स्वतास
विषारी वृत्ती कजाग
सर्पमित्रांना ना विमा
फक्त हेटाळणी डाग
सापाहून विषारी मन
माणूसकी का महाग

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## भविष्यातील पिढी वाचवायचे

**(पान २ वरुन) :** अजून शेतकऱ्याच्या घरात बाई म्हणून जन्मले की त्या बाईच्या आयुष्यात दोनच दिवस महत्त्वाचे येतात. एक दिवस हिरवा चुडा लेवून नवरी होऊन जाताना आणि दुसरं म्हणजे सरणावर जाताना. आता त्या माऊलीला पुन्हा एक नवीन जबाबदारी आली आहे. ऑक्सिजनची अजून की मशीन निघालेली नाही. माणूस कार्बन सोडतोय आणि झाड कार्बन खातयं. झाडामुळे माणूस जिवंत आहे आणि माणसामुळे झाड जिवंत आहे. जर झाड संपले तर माणूस जगेल कसा आणि माणसाला जगवायच असेल तर झाडाला जगवा लागणार आहे. म्हणून आता कोणच झाड पाहिजे जो झाड अतिशय वाढणार आहे आणि त्याचे उपयोग अनेक असलेले अशा झाडाची आता गरज आहे.

ते झाड म्हणजे बांबू आहे आणि मग मांजरा नदीच्या पट्ट्यामध्ये दोन्ही बाजूने मांजरा नदीच्या कडला बांबूचे लागवड म्हणून पृथ्वीराज बीपी जिल्हाधिकारी असताना एक मोहीम घेतली होती आणि पंधरा गावांमध्ये एकाच दिवशी तीस हजार बांबूचे झाड लावायचा पण प्रयोग केला होता. तो वाढवायचा असेल आणि आपल्या भागातल्या लोकांच्या प्रश्नांचा प्रश्न सोडवण्यासाठी झाडाची लागवड करावी लागणार आहे. ती लागवड आता जग वाचू शकतील मुलाचे रक्षण काहीच करू शकतील आणि मग आता त्या आईवर माणूस जात वाचवायची जबाबदारी महिलांवर आली आहे.

ते पुढं म्हणाले,या परिसरातल्या महिलांनी एक मागणी केली होती की आमच्या चार हजार महिला सदस्य आहेत. चार हजार महिला सदस्यांना वर्षभर काम मिळत नाही.

हा धागा धरून पाशा पटेल यांनी सांगितलं,

'जगभरामध्ये मायक्रोमीलेट म्हणजे सेंद्रिय मालापासून राळा, भुरका,सावा, भगर आणि नाचणी हे जे विविध पदार्थ करून जगभरातल्या लोकांना खाऊ घालायचं काम फिनिक्स फाउंडेशन लोदगाचे वतीने लवकरच सुरू केले जाणार आहे. जगातल्या सगळ्या मॉलमध्ये तयार झालेले ज्वारीचे केक लोदग्यामध्ये तयार झालेली बिस्किट राळ्याचे भुरक्याचे साव्याचे नाचणीचे लाडू हे सगळे जगभरामध्ये विकत मिळतील, असा करिष्मा लोदग्या मधून करायचं पाशा पटेल यांनी जाहीर केलं.'

# तुम्हाला क्वचित माहित असतील चिप्सचे 'हे' आहेत आरोग्यदायी ७ प्रकार

संध्याकाळच्या चहासोबत काही चविष्ट नाश्ता खावासा वाटतो. परंतु आरोग्याच्या कारणांमुळे आपण अनेकदा आपल्याला आवडत असलेल्या गोष्टी खात नाही. संध्याकाळी पाच वाजता चहासोबत काहीतरी खुसखुशीत खायची हौस आपल्या सर्वांनाच असते. अशा परिस्थितीत फास्ट फूड आणि चिप्सचं सेवन केल्यानं तुमचं वजन तर वाढू शकतेच, पण त्यामध्ये चरबी आणि तेलाचे प्रमाण जास्त असल्याने ते अनेक आजारांचे कारण बनू शकतात. तुम्हालाही चिप्स खायला आवडत असतील तर काळजी करू नका, हेल्दी चिप्स ट्राय करा.



हेल्दी चिप्समध्ये हे पर्याय समाविष्ट करा :

१. केळी चिप्स : केळीच्या चिप्स चव आणि आरोग्यासाठी परिपूर्ण असतात. तुम्ही चहाच्या वेळेच्या स्नॅक्समध्ये याचा समावेश करू शकता. तुम्ही तुमच्या वजनाची चिंता न करता केळीच्या चिप्सचे सेवन करू शकता. हे तुम्ही बाजारातून किंवा घरी सहज बनवू शकता.

२. बीटरूट चिप्स : बीटरूट हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. जर तुम्हाला स्नॅक म्हणून काही हेल्दी खायचे असेल तर तुम्ही बीटरूट चिप्स बनवून त्याचे सेवन करू शकता. त्यामध्ये फायबर आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात असते, ज्यामुळे पचनक्रिया चांगली राहण्यास मदत होते.

३. गाजर चिप्स : हिवाळ्यात तुम्हाला गाजर बाजारात सहज मिळतील. गाजरापासून अनेक प्रकारच्या पाककृती बनवता येतात. व्हिटॅमिन ई आणि व्हिटॅमिन सीचे गुणधर्म गाजरात आढळतात. हेल्दी स्नॅक म्हणून तुम्ही गाजर चिप्स घेऊ शकता.

४. रताळ्याचे चिप्स : रताळ्यामध्ये बीटा कॅरोटीन आणि व्हिटॅमिन सी आढळते. इतकेच नाही तर रताळ्यामध्ये कॅलरीजचे प्रम ाण खूपच कमी असते. रताळ्यापासून बनवलेल्या चिप्सचे सेवन करून तुम्ही तुमचे वजन नियंत्रणात ठेवू शकता.

५.वांग्याचे चिप्स : तुम्ही वांग्याचे चिप्स वापरून पाहू शकता. वांगी खाताना सामान्यत: मुलांचे नाक आणि तोंड मुरडतात. तुम्ही घरी हेल्दी वांग्याचे चिप्स बनवू शकता, जे चवीला कुरकुरीत तसेच आरोग्यदायी असतात.

६.मूग डाळीचे चिप्स : आपल्या गुणधर्मांमुळे, मूग डाळ आरोग्यासाठी अनेक फायदे देते. हे पचायला खूप सोपे आहे आणि आरोग्यासाठीही चांगले आहे. तुम्हाला माहिती असेल, पण तुम्ही तुमच्या आहारात चिप्सच्या स्वरूपात मूग डाळ देखील समाविष्ट करू शकता.

७.जॅकफ्रूट चिप्स : बहुतेक लोक त्यांच्या स्नॅक आहारात जॅकफ्रूट चिप्सचा समावेश करतात. केळी आणि जॅकफ्रूट चिप्स तिथे मोठ्या चवीने खातात. जॅकफ्रूट चिप्स अतिशय चवदार असतात आणि त्यात पोषक तत्वे देखील असतात.

# चेहऱ्यावरील सुरकुत्या टाळण्यासाठी करा 'हे' घरगुती उपाय

चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे हे म्हातारपणाचे लक्षण असते. पण आजकाल तरुणांच्या चेहऱ्यावरही सुरकुत्या दिसू लागल्या आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे वृद्धत्व, तणाव, कोलेजन, हार्मोन्सचे असंतुलन आणि प्रोटीनची कमतरता. यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या येतात. चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपाय करू शकता. चला तर- याविषयी जाणून घेऊया...



त्वचेची काळजी घ्या : सौंदर्य तज्ञांच्या मते, आपण वयाच्या २५ व्या वर्षापासून आपल्या त्वचेची काळजी घेणे सुरू केले पाहिजे, जेणेकरून पुढे आपल्याला सुरकुत्यांना तोंड द्यावे लागणार नाही. तुम्ही आपल्या त्वचेची जेवढ्या लवकर काळजी घ्याल तेवढ्याच लवकर तुम्हाला त्याचे परिणामही दिसून येतील. चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठी तुम्ही अंड्याचाही वापर करू शकता. यासाठी कच्च्या अंड्याचा पांढरा भाग नीट मिसळा. आता हा पॅक चेहऱ्यावर लावा. २० मिनिटानंतर सामान्य पाण्याने चेहरा धुवा.

हळदीचा वापर करा : चेहऱ्याचे सौंदर्य टिकवण्यासाठी हळदीचा वापर करणे खूप फायदेशीर आहे. याच्या वापराने चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर होण्यास मदत होते. यासाठी एका भांड्यात एक चमचा हळद आणि अर्धा चमचा गुलाबजल मिसळा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. काही काळ राहू द्या. नंतर चेहरा सामान्य किंवा कोमट पाण्याने धुवा. हा उपाय आठवड्यातून दोनदा केला जाऊ शकतो.

सुरकुत्या दूर होण्यास मदत : चांगले खाल्ल्याने त्वचा चमकदार राहते. त्यामुळे आहारात भरपूर फळे आणि हिरव्या भाज्यांचा समावेश करा. नाश्त्यात ड्रायफ्रुटस घ्या आणि दिवसभरात किमान ३-४ लीटर पाणी प्या. यामुळे तुमची त्वचा दीर्घकाळ तरूण राहते. किवी फळाचा वापर करूनही चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर केल्या जाऊ शकतात. यासाठी किवी फळ चांगले मॅश करा आणि पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. पेस्ट लावल्यानंतर काही वेळ अशीच राहू द्या. त्यानंतर सामान्य पाण्याने चेहरा धुवा. हे उपाय केल्याने चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर होण्यास मदत होते.

उन्हापासून सुरक्षा : सर्वात आधी तुम्हाला तुमच्या त्वचेला सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून स्वत:चे रक्षण केले पाहिजे. २० ते ३० च्या वयांत तीव्र उन तुमच्या त्वचेलाच नुकसान पोहोचवत नाही तर, दीर्घ काळापर्यंत त्याचा प्रभाव सुरकुत्याच्या रुपात तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. उन्हामुळे जेव्हा त्वचेचे नुकसान होते तेव्हा तातडीने त्वचा तज्ञाला ते दाखवले पाहिजे. तो म इक्रोडर्माब्रेशन, केमिकल पील, लेजर थेरेपी आणि रेटिनॉइडच्या मदतीने तुमच्या त्वचेवर उपाचार करू शकतो.

## उपदेशकथा

पं. मदनमोहन मालवीय हे काशीचे कर्मठ ब्राह्मण. स्नानसंध्या, पूजा-अर्चा यात कधी कसूर करत नसत त्यामुळे होई काय, आगगाडी वेळेवर पकडण्याचे 'पातक' त्यांच्याकडून होत नसे! एकदा मालवीयजी धापा टाकीत स्थानकावर पोहचले नि गाडी सुटणार एवढ्यात कसाबसा त्यांनी डबा गाठला पण तिकिट काढायचे गडबडीत राहून गेले. अलाहाबाद या स्थानकावर उतरून त्यांनी तिकिट तपासनिसांना आपली अडचण सांगितली. त्याने सांगितले, 'आम्ही तुम्हाला ओळखतो. तुम्ही खुशाल बाहेर पडा !' पण या गोष्टीला त्यांची सदसद्विवेकबुद्धी राजी होईना. ते म्हणाले, 'तुम्ही माझ्याकडून तिकिटाचे पैसे घ्या' तपासनीस म्हणाला, 'तुम्हाला मग भुर्दंडही भरावा लागेल!' त्यालाही मालवायजी तयार नव्हते. शेवटी त्यांनी चिरंजीवांना तिकिट खिडकीवर पाठवून अलाहाबाद ते बनारसचे तिकिट आणवले नि तपासनिसांसमोर त्याचे तुकडे केले व मगच ते बाहेर पडले!

कथा उपदेश : फुकट प्रवास करू नये.

## (गुरु वचन) समान भावाने सेवा

एका वेळची गोष्ट आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्याजवळ त्यांच्या मित्राचा एक नोकर काही कामानिमित्त आला. विद्यासागर बाहेर आले आणि त्यांनी पाहिले तर घराच्या खाली एक वयस्कर व्यक्ती उभा होता. आणि तो खूप थकलेला होता. अशा स्थितीत तो वरती येण्यास असमर्थ होता. हे पाहून विद्यासागर त्या व्यक्तीसाठी पिण्यास पाणी घेऊन आले आणि परत जाऊन पंखा घेऊन आले आणि स्वत: हवा मारु लागले. विद्यासागरना असे करताना पाहून त्यांचा मित्र म्हणाला ज्या व्यक्तीस आपण पाणी पाजत आहात आणि पंख्याने हवा मारत आहात तो एक सामान्य सेवक आहे. मित्राचे हे बोलणे ऐकून विद्यासागर म्हणाले ठीक आहे, हा एक सेवक आहे, परंतु माणूसच आहे.

यावरुन विद्यासागर यांनी मित्राला आपल्या लहानपणीची एक गोष्ट सांगितली, माझे वडील एकदा बाजारात चक्कर येऊन पडले. तेथे चन्ना विकणाऱ्या एका व्यक्तीने आपले काम सोडून ताबडतोब पाणी आणले आणि त्याचा शिडकावा मारला आणि नंतर पंखा आणून त्याने हवाही मारु लागला, असे करत असताना तो आपले सामानही विसरुन गेला. त्याला केवळ माझ्या वडिलांची चिंता होती. थोड्याच वेळात जेव्हा माझे वडील उठून बसले. तेव्हा त्यांनी त्या व्यक्तीचे आभार मानले. या घटनेमुळे मी एवढा प्रभावित झालो की, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची मदत करणे आपला धर्म मानला. शेवटी माझ्यासाठी ही गोष्ट कोणतेच बंधन ठेवत नाही की, कोणी व्यक्ती उच्च जातीचा आहे की, खालच्या जातीचा आहे. छोटा असो व मोठा मी सर्वांना समान समजतो. आणि त्यांची समान भावानेच सेवा करतो.

# श्याम ठाणेदार यांना सह्याद्रीरत्न पुरस्कार !

पुणे : ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पुण्यातील टॅलेंट कट्टा ( अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ संलग्न ) संस्थेतर्फे महाराष्ट्रातील स्तंभलेखक श्याम ठाणेदार यांना सह्याद्रिरत्न पुरस्कार देण्यात आला. सह्याद्रीरत्न हा महाराष्ट्रातील मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार समजला जातो. १८ऑगस्ट रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात श्याम ठाणेदार यांना हा पुरस्कार देण्यात आला. १८ ऑगस्ट रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते श्याम ठाणेदार यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पदक असे पुरस्काराचे स्वरूप होते.



यावेळी लक्ष्मण सावंत ( माजी आमदार बोपोडी मतदार संघ ) नितीन धवणे पाटील ( प्रसिद्ध उद्योजक मुंबई ) कुमारी आर्या घारे ( प्रसिद्ध सिने अभिनेत्री ) डॉ संतोष सदाशिव मचाले ( प्रसिद्ध लेखक ) तसेच दीपक जाधव ( टॅलेंट कट्टा संस्थापक अध्यक्ष ) आदी मान्यवर उपस्थित होते. श्याम ठाणेदार हे महाराष्ट्रातले प्रसिद्ध स्तंभ लेखक असून महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रात ते नियमितपणे स्तंभ लेखन करतात. महाराष्ट्रभर त्यांचा वाचक वर्ग आहे. त्यांचे स्तंभ लेखनातील योगदान विचारात घेऊनच त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. स्तंभ लेखनातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. सह्याद्रीरत्न पुरस्कार मिळाल्याने श्याम ठाणेदार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## स्व. सूरज झुंजे पाटील यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

लातूर/प्रतिनिधी : माणसाने किती एकनिष्ठ राहावं आणि किती कट्टर असावं याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्व.सूरज झुंजे पाटील. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा एक सच्चा शिवसैनिक स्व.सूरज झुंजे पाटील यांनी शिवसेना वाढीसाठी अथक प्रयत्न केले. त्यांचे सामाजिक कामही खूप मोठे होते. राजकारणापेक्षाही समाजकारण कारणावर त्यांचा जास्त भर असायच्या.अडचणीच्या वेळी मदतीला धावून जाणे हाच त्यांचा दिनक्रम असायचा. अशा हरहून्नरी कार्यकर्त्याच्या जयंती निमित्त (१९) ऑगस्ट रोजी शिवसेना ,युवतीसेना अँड श्रद्धा जवळगेकर व युवती सेनाच्या पदाधिकारी यांच्या माध्यमातून रक्तदान शिबीर पार पडले.या रक्तदान शिबिरातून तब्बल ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. दरम्यान या कार्यक्रमात माजी उपजिल्हा प्रमुख शंकर रांजणकर, महानगर प्रमुख सुनील बसपूरे, युवासेना जिल्हाधिकारी अॅड.राहुल मातोळकर, युवती तालुकाधिकारी सुचित्रा साखरे, युवती शहरधिकारी मोकक्षदा,राजश्री चांडसूरे, योगेश्री यंवंगे,शिवराज मुगावकर, उमर कलाल, शशिकांत इरले ब्रम्हा तिघिले, दीपक आपरे, नागेश्र्वर कापसे सर्व शिवसैनिक उपस्थित होते.



## राशी भविष्य २० ऑगस्ट २०२४

मेष : शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम

जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर

आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

मिथुन:शुभ रंग-क़ाळा, शुभ दिशा: दक्षिण

लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

कर्क :शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण

उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

सिंह : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर

कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत सम ाधानी रहाल.

कन्या : शुभ रंग:क़ाळा, शुभ दिशा: पश्चिम

व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

तुळ : शुभ रंग: ल़ाल, शुभ दिशा: दक्षिण

कुटुंबात धार्मिक, शुभ कार्याची योजना आखली जाईल. आपल्या व्यवहार चातुर्याचे कौतुक होईल. व्यापारात प्रगती होईल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

वृश्चिक:शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व

सामाजिक कामात सहभाग घ्याल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार नौकरीत आपले वर्चस्व वाढेल. अनावश्यक वाद विवाद टाळा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

धनु: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम

आपली अनावश्यक खर्च करण्याच्या प्रवृत्तीमुळे अडचण निर्माण होईल. व्यवसायिक समस्या निर्माण होतील. वेळेवर कामे पूर्ण न झाल्यामुळे तणावग्रस्त रहाल. वाचनातील गोडी वाढेल.

मकर: शुभ रंग- लाल, शुभ दिशा- पश्चिम

मनमिळावू स्वभाव असल्या कारणामुळे अडकून पडलेली कामे पूर्ण होतील. नौकरीमध्ये मान सन्मान वाढेल. कौटुंबिक समस्याकडे दुर्लक्ष करू नका.

कुंभ : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम

आपल्या बौद्धीक क्षमतेवर अडचणी पार पडतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकत्रडे लक्ष द्यावे. धार्मिक कामासाठी पैसा खर्च होईल. जीवनसाथीचे सहकार्य मिळेल.

मीन : शुभ रंग: पिवळा,शुभ दिशा: पूर्व

राजकीय व्यक्तिंकडून फायदा मिळेल. आपले विरोधक आपल्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतील. वैचारिक असंतोष राहील. कौटुंबिक वाद होण्याची शक्यता आहे. निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

## इतिहासात आजचा दिवस २० ऑगस्ट

अंतरराष्ट्रीय

१८५६ – 'कंडेन्स्ड मिल्क' तयार करण्याच्या प्रक्रियेचा शोध.
१८९७ – रोनाल्ड रॉस यांनी हिवतापाचा प्रसार 'अॅनोफिलस डासां' मार्फत होतो, हे सिद्ध केले.
१९४१ – फ्रान्समधील भूमिगत चळवळ उखडून टाकण्याच्या उद्देशाने जर्मनांनी एका दिवसात ५० हजार फ्रेंच नागरिकांना अटक केली. यातल्या ज्यूंना छळछावण्यांत पाठविण्यात आले.
१९६८ – रशियन सैन्य झेकोस्लोव्हाकियात शिरले.
१९८७ – संत लोंगोवाल यांची भर सभेत खलिस्तानवादी अतिरेक्यांकडून हत्या.
२००६ – युद्धबंदीनंतर इस्त्राइलने लेबनानवर परत एकदा मोठा हल्ला केला. या हल्ल्यात १२८७ जण ठार झाले तर ४०५४ जण जखमी झाले.
२००६ – कोलंबोत भारतीय नेमबाजांनी १० व्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत २५ मीटर पिस्तूल नेमबाजीत २ सुवर्ण जिंकले.
२००७ – पाकिस्तानी अष्टपैलू अब्दुल रज्जाकने पाकिस्तानच्या टवेंटी-२० विश्वचषक संघातून वगळल्याच्या विरोधात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधुन निवृत्त होण्याचा निर्णय घेतला.
२००७ – भारताचा रोहन बोपन्ना व त्याचा पाकिस्तानी जोडीदार ऐसाम उल हक कुरेशीने न्यूयार्कच्या ब्रांक्समधील चॅलेंजर स्पर्धा जिंकून चौथे विजतेपद पटकावले.
२००८ – माद्रिद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर थोड्याच वेळात 'स्पेन एअर' च्या विमानात स्फोट होऊन विमानातील ४५ प्रवासी ठार झाले.

राष्ट्रीय

१९७९ – इंदिरा गांधींनी पाठिंबा काढून घेतल्याने चरणसिंग सरकार कोसळले.
२००३ – तेलगीप्रकरणी सीबीआयने नाशिकच्या छापखान्यावर (सिक्युरिटी प्रेस) छापा घातला.
२००३ – आसाममध्ये बिहारींविरुद्ध दंगलीत ५० ठार.
२००३ – लिएंडर पेस मेंदूतील गाठीवरील उपचारांसाठी ओर्लांडो येथील रुग्णालयात दाखल.
२००४ – जलतरणपटू बुला चौधरीने पाल्कची सामुद्रधुनी पोहून पार केली. जगातील सात सागरांतील खाड्या तिने ओलांडल्या.
२००७ – बेकायदेशीरित्या शस्त्रे बाळगल्या प्रकरणी विशेष टाडा न्याय़ालयाने सहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ठोठावलेल्या अभिनेता संजय दत्तला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला.
२००८ – कुस्तीत १९५२ नंतर भारताला कास्य पदक मि ळाले. बीजींग ऑलम्पिकमध्ये हरियाणातील सुशीलकुमारने ६६ किलोग्रम वजन गटात कजाकिस्तानच्या पैलवानाला पराभूत करुन कांस्य पदक जिंकले.

जन्म

१७७९ – थॉमस बझेलियस, रसायनशास्त्रातील मूलद्रव्यांच्या लघुरूप संज्ञा मांडण्याचा परिपाठ सुरू करणाऱ्या.
१८१८ – एमिली ब्राँटे, 'वुदरिंग हाइट्स'ची लेखिका.
१८७१ – चक्रधरस्वामी, महानुभाव पंथाचे संस्थापक.
१९४४ – राजीव गांधी, इंदिरा गांधींचे सुपुत्र, भारताचे माजी पंतप्रधान.

निधन

१६३९ – फॉन वोबरफेल्ट मार्टिन ओपित्झ, जर्मन कवी आणि समीक्षक.
१७६७ – विठ्ठल शिवदेव, पेशवाईतील शूर पुरुष.
१९१२ – जनरल विल्यम बूथ, साल्व्हेशन आर्मीची स्थापना करणाऱ्या.
१९८४ – 'रघुवीर', महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894